जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट दिनांक - २८/१२/२०२३

पोलीस मुख्यालय,शिवाजीनगर पुणे शहर

# पुणे शहर पोलीस घटक महाराष्ट्र राज्य पोलीस शुटिंग स्पर्धेत चॅंपियन सपोनि राकेश कदम यांची जकार्ता,इंडोनेशिया येथे एशिएन शुटींग स्पर्धेकरीता भारतीय संघात निवड

दि २०/१२/२०२३ ते दि २६/१२/२०२३ रोजी दरम्यान रा.रा.पो.बल गट क्र. ०१ पुणे यांनी वडाची वाडी शुटिंग रेंज व शिवछत्रपतीक्रीडा संकुल, म्हाळुंगे बालेवाडी शुटिंग रेंज येथे महाराष्ट्र राज्य पोलीस शुटिंग (सर्व्हिस वेपन व स्पेट्र्स वेपन) स्पर्धा २०२३ आयोजीत केली होती. सदर स्पर्धेत महाराष्ट्र पोलीस दलातील एकुण १५ सघांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत पुणे शहर पोलीस दलातील एकुण १७ नेमबाजांनी एकुण २० सुवर्ण, १२ रौप्य व ०७ कांस्य पदके प्राप्त करीत पुणे व पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयास सर्व्हिस वेपन, स्पोर्ट्स पुरुष व स्पोर्ट्स महिला या तिन्ही प्रकारात सलग दुसऱ्या वर्षी विजेतेपद मिळवून दिले.

या स्पर्धेत पोलीस निरीक्षक अंकुश चिंतामण,०१ सुवर्ण,०१ रौप्य, सपोनि राकेश कदम,०२ सुवर्ण,०१ रौप्य, महिला स.पो.नि आरती खेतमाळीस,०१ कांस्य, पोउपनि धिरज कांबळे ०१ कांस्य, सपोफौ नितीन शिंदे, ०१ रौप्य,०१ कांस्य, सपोफौ सुनिल पवार ०१ रौप्य ०१ कांस्य, सपोफौ राजेंद्र पाटील ०६ सुवर्ण ०१ रौप्य, पो.हवा.अमोल नेवसे ०२ सुवर्ण, पो.हवा महेश जाधव ०१ सुवर्ण,०२ रौप्य,०१ कांस्य, पो.हवा.अनिल उपरे ०१ रौप्य, पो.हवा.मंगेश खेडकर ०१ सुवर्ण, पो.हवा.विजय कांबळे ०१ कांस्य, म.पो.हवा.वैशाली गोडगे ०१ सुवर्ण,०२ रौप्य, पो.ना.दत्तात्रय खाडे ०१ सुवर्ण,०१ रौप्य, पो.हवा.सुहास धायगुडे आणि स.पो.फौ.राजेंद्र मोरे यांनी चमकदार कामगिरी करत पदके प्राप्त केली.

स.पो.फौ.राजेंद्र पाटील यांनी सलग तिसऱ्या वर्षी स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट पिस्टल शुटर व सर्वोत्कृष्ट एमपी ५ शुटरच्या किताबासह चषक प्राप्त केले. तसेच सदर स्पर्धेत सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे **सपोनि राकेश कदम यांची जकार्ता, इंडोनेशिया येथे जानेवारी २०२४ मधे होणा-या एशिएन शुटींग चॅम्पियनशीप स्पर्धेकरीता २५ मीटर सेंटर फायर पिस्टल प्रकारात भारतीय संघात निवड झाली आहे.** त्यांचेसह विजेत्या संघाचे मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री रितेश कुमार यांनी अभिनंदन केले.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त पुणे शहर श्री.रितेशकुमार, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे शाखा,पुणे,(पोलिस सह आयुक्त अतिरिक्त कार्यभार) श्री.रामनाथ पोकळे, मा.अपर पोलीस आयुक्त (प्रशासन) श्री.अरविंद चावरिया, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) श्री.रोहिदास पवार यांच्या मार्गदर्शनाखाली रा.पो.नि. दशरथ हटकर, रा.पो.उप निरी. मांढरे,टेंभूर्णे,साबळे, पो.हवा रोमाडे व पो.ना हिंगे यांचे सहकार्याने केली.

सदर कामगिरीबाबत मा.पोलीस आयुक्त पुणे शहर श्री.रितेशकुमार यांनी सर्व विजेत्या खेळाडुचे अभिनंदन केले आहे.





